**समुह साधन केंद्र स्तरावर दरमहा**
**शिक्षण परिषदेच्या आयोजनाबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**शालेय शिक्षण व क्रीडा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक: संकीर्ण ३२१६/(९४/२०१६) प्रशिक्षण**

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक: ०१ सप्टेंबर, २०१६

**शासन परिपत्रक :-**

सर्व शिक्षा अभियानातंर्गत यापूर्वी गट संमेलनाचे आयोजन समूह साधन केंद्र स्तरावर आयोजित केले जात असे. यामध्ये केंद्रातंर्गत सर्व शिक्षक एकत्र येवून शैक्षणिक आदर्श पाठाचे सादरीकरण शिक्षकांकडून करण्यात येत असत. विद्या प्राधिकरण पुणे यांचेकडून गट संमेलनाचे आयोजन करण्याबाबतची कृती पुस्तिका व नियोजन सर्व जिल्हयांना उपलब्ध करुन दिले होते. शैक्षणिक विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी गट संमेलन उपयुक्त ठरत होते असे मत व्यक्त केले जाते. सर्व शिक्षा अभियानातंर्गत भारत सरकारने गट संमेलनासाठी निधी बंद केल्यानंतर सदर गट संमेलनाचे आयोजन करणे बंद करण्यात आले आहे.

राज्यात प्रगत शैक्षणिक महाराष्ट्र कार्यक्रमांतर्गत सर्वच स्तरावर यंत्रणा कार्यप्रेरित होवून योग्य दिशेने १०० टक्के मुले शिकण्याच्या उद्देशाने काम करत आहेत. यासाठी राज्य, विभाग, जिल्हा व तालुका पातळीवरील शिक्षण परिषदा लाभदायी ठरत आहेत. यामध्ये प्रगत शाळा, डिजिटल शाळा, एबीएल शाळा, मोठया प्रमाणात समाज सहभाग मिळविणाऱ्या शाळा, आयएसओ ९००१ नामांकित शाळांमधील शिक्षक, केंद्राचे केंद्र प्रमुख, विस्तार अधिकारी, गट शिक्षणाधिकारी यांचे सादरीकरण करण्यात येते. १०० टक्के शाळा, केंद्र, बीट प्रगत करण्यासाठी अवलंबिण्यात आलेल्या प्रक्रिया, पध्दती, तंत्र व कौशल्य या बाबींचा सादरीकरणामध्ये समावेश असतो. याचा उपयोग शिक्षण परिषदेमध्ये उपस्थित असणाऱ्या संबंधितांना होताना दिसून येतो. याच धर्तीवर राज्यातील सर्व समुह साधन केंद्र स्तरावर दरमहा शिक्षण परिषदेचे आयोजन करण्यात यावे. यामध्ये १०० टक्के वर्ग, शाळा प्रगत करणाऱ्या शिक्षक व मुख्याध्यापक यांचे सादरीकरण आयोजित करावे. तसेच संपूर्ण केंद्र शाळाबाहय मूल विरहीत करण्यासाठीचे नियोजन व उपाययोजना, १०० टक्के मुलांची नियमित उपस्थिती, वाचन कार्यक्रम, स्वच्छता प्रक्रिया अहवालातील दर्शके (Indicators) इत्यादी बाबींचाही त्यामध्ये समावेश करावा. केंद्रातंर्गत सर्व शाळा १०० टक्के प्रगत करण्यासाठीची चर्चा, नियोजन व कृती आराखडा या शिक्षण परिषदांच्या माध्यमातून तयार करुन त्याप्रमाणे प्रत्यक्ष उद्दिष्ट प्राप्ती करण्यासाठीची अंमलबजावणी करण्यात यावी.

दरमहाच्या समुह साधन केंद्रस्तरावरील शिक्षण परिषदांचा अहवाल जिल्हयाच्या प्रक्रिया अहवालामध्ये सादर करण्यात यावा.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१६०९०११७२२३७६२२१ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nand Kumar

Digitally signed by Nand Kumar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=School Education And Sports, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c98b875883e76c14d91ed7b89546e6c11e439cad32d7f5cff487862cc567ee39, cn=Nand Kumar
Date: 2016.09.01 17:23:44 +05'30'

( नंद कुमार )
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) मा.मंत्री, शालेय शिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी,
२) आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे,
३) राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, चर्नीरोड, मुंबई,
४) संचालक, महाराष्ट्र राज्य, शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे,
५) शिक्षण संचालक (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
६) शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे,
७) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
८) आयुक्त, महानगरपालिका (सर्व),
९) विभागीय शिक्षण उपसंचालक (सर्व)
१०) प्राचार्य, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था (सर्व),
११) शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक/ निरंतर) जिल्हा परिषद (सर्व),